MHPU290002792026

# किरकोळ फौजदारी जामीन अर्ज क्र. ८४/२०२६ मधील निशाणी ०१ वरील आदेश

(वाल्मीक बाजीराव माने  वि. महाराष्ट्र शासन)

अर्जदार-  **वाल्मीक बाजीराव माने**  याने अटकपुर्व जामीन मिळणेसाठी हा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ***४८२*** नुसार केला आहे.

| | | |
|---|---|---|
| पोलीस ठाणे | - | कामशेत पोलीस स्टेशन |
| गुन्हा रजिस्टर क्र | - | **४४/२०२६** |
| कलम | - | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम  ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये. |
| गुन्हा दाखल तारीख | - | २३/०२/२०२६ |
| गुन्हा घडल्याची तारीख | - | १८/१०/२०१२ |
| अटक तारीख | - | अटकपूर्व जामीन अर्ज |
| कलम (जामीन अर्ज) | - | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ४८२ नुसार |

२.   जामिनाचे मुद्दे -

१. आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही.
   आरोपीच्या विरूध्द प्रथमदर्शनी गुन्हा नाही.

२. आरोपी हा निष्पाप आहे.

३. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार कथित गुन्हा दि. १८/१०/२०१२ व दि. १०/०५/२०१३ रोजी घडला असुन, एफआयआर मात्र दि. २३/०२/२०२६ रोजीची म्हणजे तब्बल १३ वर्षानंतर नोंदविण्यात आली आहे.

४. गुन्हा चालविण्याचे न्यायक्षेत्र मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या अधिपत्याखाली चालविण्याचे आहे.

५. आरोप असंदीग्ध आहेत.

६. सदर गुन्हा नोंद होण्यास फिर्यादीने कोणतेही सबळ कारण दिलेले नाही.

७. सदर गुन्हयातील सह-आरोपी किशोर दामाजी तायडे यांना मा.

जे.एम.एफ.सी न्यायालय, वडगाव मावळ यांनी नियमित जामीनावर सोडले आहे.

८. सदर गुन्हयाला मृत्यूदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा नाही.
९. अर्जदाराचा गुन्हयातील वादग्रस्त कागदपत्रांच्या कथित तयारीत किंवा अंमलबजावणीत कोणताही थेट सहभाग नाही.
१०. अर्जदाराने कोणताही बनावट दस्तऐवज किंवा कोणताही विक्रीखत अमलात आणलेला नाही.
११. फिर्यादिनुसार सदर वाद हा दिवाणी स्वरूपाचा आहे. तक्रारदाराने या दिवाणी वादाला फौजदारी रंग दिला असुन तक्रारदाराने काहीतरी छुप्या हेतूने सदर एफ.आय.आर दिली आहे.
१२. कथित गुन्हा हा कथित विक्रीखत दस्तऐवजांवर आधारित असुन सदर दस्तऐवज उपनिबंधक कार्यालयात उपलब्ध आहेत.
१३. अर्जदाराचा गुन्हयाचा पूर्वीचा कोणताही पूर्वइतिहास नाही.
१४. अर्जदार हे वरील पत्त्यावरील कायमस्वरूपी रहिवाशी आहेत.
१५. अर्जदार हे डोळयांच्या पडद्याच्या आजाराने त्रस्त असून त्याला दिवसातून आठ वेळा औषध घालावे लागते.
१६. कोठाडीतील तपासाची आवश्कता नाही.

या व इतर कारणांसह अटकपूर्व जामीन मिळावा अशी विनंती केली.

३. तपासी अंमलदाराचे लेखी म्हणणे पत्र दि. १३/०४/२०२६ चे पत्राने दाखल केलेले आहे. त्यानुसार वादग्रस्त खरेदी खतामधील साक्षीदार म्हणुन सहया करणारे आरोपी क्र. ३ व ४ हे नमुद पत्त्यावर मिळून येत नाहीत. सन २०१२ मध्ये कलेले वादग्रस्त खरेदी खत क्र. ६१४५/२०१२ मधील खरेदीखत लिहून देणार म्हणुन बनावट असलेली महिला, आरोपी क्र. ७ तसेच सन-२०१३ मधील वादग्रस्त खरेदी खत क्र. ३५४४/२०१३ मधील लिहून देणार असलेला बनावट इसम, आरोपी क्र. ०८ यांचा शोध घेऊन यांचा तपास करायचा आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद, त्यांनी दाखल केलेले अर्ज, म्हणणे व कथने प्रकरणातील कागदपत्रांशी सुसंगत आहेत.

५. फिर्याद दि. २३/०२/२०२६ रोजी श्रीनिवास नागाभुषण पोलारावतु दिली आहे. त्यानुसार सन १९८६ मध्ये त्याचे वडील श्रीनिवास नागाभुषण पोलारावतु व वडीलांचा

मित्र पर्वतीनेनी सतिषबाबू यांनी मुंढावरे गावी ता. मावळ येथील जमीन गट नं. ८७ मधील २ हेक्टर ४५.१ आर जमीनीपैकी ४१ आर व ८१ गुंठे अशी मिळकत मुळ मालक दत्तात्रय बाबू धुमाळ व इतर २ यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतलेली आहे. त्याच्या वडीलांचे खरेदीखत दि. ०१/०९/१९८६ रोजी नोंदणी कार्यालयात खरेदीखत क्र. २२००/१९८६ या क्रमांकाने नोंदणीकृत झालेली आहे. त्या मिळकतीच्या ७/१२ उता-यावर त्याच्या वडीलांचे नाव व पर्वतीनेनी याचे नाव फेरफार करून आलेले आहे. तसेच पर्वतीनेनी हिच्या नावे सदर गटातील ८१ गुंठे मिळकतीचे खरेदीखत क्र. २२०१/१९८६ ने नोंदविलेले आहे. पर्वतीनेनी हया दि. १४/०४/२०१४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्याचे वडील कोला रावतो हे दि. ३१/०१/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. पर्वती नेनो हिचे पती सतिश बाबू यांनी त्या जमीनीचे power of Attorney फिर्यादीच्या नावे करून दिलेली आहे.

६. दहा महिन्यापूर्वी त्याची बहिण हेमाराव ही त्या जमीनीचा ७/१२ उतारा काढण्यासाठी मंडळ अधिकारी, कामशेत याच्याकडे आली होती. त्यावेळी तिला वरील मिळकतीच्या ७/१२ उता-यावर तिचे वडील व पर्वतीनेनी, सतिश बाबू यांची नावे दिसली नाहीत. तिने तसे फिर्यादीला सांगितले. फिर्यादीने नोंदणी कार्यालयात खात्री केली. त्याला आढळुन आले की, वरील दोन्ही मिळकतीचे १८/१०/२०१२ आणि दि. १०/०५/२०१३ रोजी खरेदीखत क्र. ६१४५/२०१२ व ३५४४/२०१३ या खोटया बनावट दस्ताने मिळकत हस्तातंरित झालेली आहे. ती मिळकत अर्जुन पवार व इतर ३० लोकांनी विकत घेतलेली आहे. पार्वतीनेनी, लिलावती, सतिश बाबू वर्य वर्ष ८० राहणार- अप्सरा अपार्टमेंट, पाली हिल, वांद्रा, मुंबई असे नाव धारण केलेल्या बनावट महिलेने करून दिलेला आहे. त्याच्या वडीलांची जमीन भुषण अशोक तुपे व इतर १० लोकांनी विकत घेतल्याचे दिसले. त्या खरेदीखतात त्याच्या वडीलांचे नावे असलेले खोटे व बनावट खरेदी खत आहे. त्या दोन्ही खरेदीखतामध्ये खरेदीखत लिहून देणार यांना ओळख देणारे म्हणुन वाल्मीक बाजीराव माने व किशोर दामाजी तायडे, आणि दिलीप विश्वनाथ चौधरी व किरण काशिनाथ म्हासुळ अशी नावे आहेत. त्याच्या वडीलांचे नाव असलेल्या खरेदीखतावर बाल्मीक बाजीराव माने, रा. थेरगाव

व किशोर दामाजी तायडे, रा. कामशेत, मावळ असे नाव आहे. यावरून त्याची खात्री पडली की, वरील दोन्ही खरेदीखते हे बोगस, खोटे व बनावट आहेत.

७. फिर्याद वाचली असता लक्षात येते की, खरेदीखत ही अनुक्रमे सन २०१२ व सन २०१३ मध्ये नोंदविलेली आहेत. परंतु त्याची माहिती/ज्ञान ही फिर्यादीच्या बहिणीला १० महिन्यापूर्वी झाली. तिने तसे तिच्या भावाला सांगितले. त्यानंतर तो दुय्यम निबंधक कार्यालय/ नोंदणी कार्यालयात गेला. कागदपत्रांची पाहणी केली. त्यानंतर फिर्याद दिलेली आहे. त्यामुळे वरवर फिर्याद झाल्याचे दिसते. परंतु तो उशिर स्पष्टपणे स्पष्टीकरणासह दिलेला आहे. ते स्पष्टीकरण योग्य संयुक्तीक वाटत आहे. ज्ञान प्राप्त झाल्यापासून फिर्याद ही शक्य तितक्या लवकर दिलेली आहे. त्यामुळे फिर्याद देणेस झालेल्या उशिराचे मुद्दयाचे भांडवल अर्जदाराला करता येणार नाही.

८. आरोपी किशोर दामाजी तायडे याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी दि. ०५/०३/२०२६ रोजी जामीन दिलेला आहे. परंतु त्याला दि. ०२/०३/२०२६ रोजी पोलीसांनी अटक केली होती. दि. ०५/०३/२०२६ पर्यंत त्याला पोलीस कोठडी दिली होती. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याला जामीन दिलेला आहे. या आरोपीला अटक केलेली नाही. तसेच त्याच्या कोठडीतील तपासही झालेला नाही. त्यामुळे हा अर्जदार/आरोपी हा आरोपी क्र. ०२ किशोर दामाजी तायडे याला मिळालेल्या जामीनाचे भांडवल करू शकत नाही.

९. दोन्ही खरेदीखतातील बनावट महिला व बनावट इसम हे फरार आहेत. त्यांचा अजूनही शोध लागलेला नाही. खरेदीखतात आरोपीचा पत्ता राहणार- थेरगाव, पुणे असा दाखविलेला आहे. त्याने फिर्यादीचे वडील पोलारावतु नागभुषण अप्पलस्वामी राहणार- मुंबई, खार येथील व त्यानंतर हैद्राबाद येथील राहणारे होते. या अर्जदार/आरोपीचा व पोलारावतु यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध असल्याचे दिसत नाही. त्यामुळे या अर्जदाराने पोलारावतु याला ओळखण्याचे कोणतेही कारण नाही. ज्या इसमाला ओळखत नाही त्या इसमाला ओळखत असल्याचे सरकारी अधिका-यांसमोर लिहून देणे हा दखलपात्र गुन्हा आहे. एखादी

मिळकत, मिळकतीचे खरेदीखत किंवा विक्री करताना खरेदीदाराला किंवा विक्रीदाराला, ओळखत नसताना, ओळखत असल्याचे लिहून देणे हा गंभीर प्रकार आहे. या प्रकारामुळे निष्कारण फिर्यादीच्या वडीलांची जमीन खोटया व बोगस खरेदीखताने इतर माणसांना विक्री करून त्या माणसांचे नावे मिळकत दकदिल झालेल्या आहेत. एखाद्या माणसाचे हक्क हिरावून घेतल्या सारखे आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपींनी ओळख नसलेल्या इसमाची खरेदीखतावर विकत देणार याला ओळखतो असे म्हणणे म्हणजे त्या गुन्हयात सामील असल्यासारखे आहे. सदरचा प्रकार दिवाणी वादाचा असल्याचे आजिबात दिसत नाही. त्याने त्या खरेदीखतावर कोणत्या स्थितीत विक्री देणा-या इसमाची ओळख पटवली. त्याचे कोठलेही समाधानकारक कारण दिलेले नाही. असे प्रकार या भागात मिळकतीं बाबत सातत्याने होत आहेत. दररोज अनेक इसमांची अशा प्रकारे फसवणुक होत आहे. त्यामुळे या प्रकाराला आळा घालण्यासाठी योग्य प्रकारे तपास होऊन तपासी यंत्रणेला गुन्हा शाबित करण्यासाठी संधी देणे आवश्यक झालेले आहे. कोठाडीतील तपास केल्यानेच यातील पुढचे धागेदोरे तपासी अंमलदाराला मिळण्याची शक्यता आहे. आरोपी खोटे असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. कोठडीतील तपासाची आवश्यकता आहे. थोडक्यात अटकपूर्व जामीन अर्ज नामंजुर करणे योग्य, रास्त व न्यायाचे आहे.

६.   सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे अंतीम आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१.   अर्जदारांचा अर्ज निशाणी क्र.०१ नामंजुर करण्यात आला.

११.  पोलीस ठाण्याला वरीलप्रमाणे कळविण्यात यावे.

DATTATREYA KASHINATH ANBHULE   Digitally signed by DATTATREYA KASHINATH ANBHULE Date: 2026.08.12 17:53:10 +0530

दिनांक – १०/०८/२०२६                    (डी. के. अनभुले)
अति. सत्र न्यायाधीश, वडगाव मावळ, पुणे.